अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली.
दिनांक :– ०७.०१.२०२०

## प्रेसनोट

**लोकसेवक श्री गणेश माणिकराव सुळ, वय ४५ वर्ष, व्यवसाय नौकरी, ग्रामसेवक, वर्ग–३, ग्रामपंचायत खांडेगाव, पंचायत समीती, वसमत, जि.हिंगोली. रा.विकास नगर, परभणी ता.जि.परभणी यांनी तक्रारदार यांना त्यांचे विरूध्द बी.डी.ओ., पंचायत समीती वसमत यांना दिलेला तक्रारी अर्ज मागे घेण्यास सांगुण अनुचित लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्याने त्यांना ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १९.१२.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे नावे असलेल्या खांडेगाव येथील गट क्रमांक १२२ मधील प्लॉटवर बांधलेल्या घराची नोंद घेवुन नमुना नंबर ८ देण्यासाठी ग्रामसेवक श्री सुळ हे ५,०००/– रूपयांची लाचेची मागणी करित असुन त्यांचे विरूध्द दिलेला तक्रारी अर्ज मागे घेण्यासाठी सांगत असले बाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक ०६.०१.२०२० रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक गणेश माणिकराव सुळ, ग्रामसेवक खांडेगाव यांनी तक्रारदार फिर्यादी यांचे नावे असलेल्या खांडेगाव येथील गट क्रमांक १२२ मधील प्लॉटवर बांधलेल्या घराची नोंद ग्रामपंचायत रेकॉर्डला घेवुन नमुना नं.८ देण्याचा मोबदला म्हणुन तक्रारदार यांनी त्यांचे विरूध्द बी.डी.ओ. पंचायत समीती, वसमत यांना दिलेली तक्रार मागे घेण्याची मागणी करून अनुचित लाभ घेण्याच्या उद्‌देशाने पदाचा गैरवापर करण्याचा प्रयत्न केला म्हणुन त्यांचेवर पोलीस स्टेशन वसमत शहर येथे गुरन ०६/२०२० कलम ७ भ्र.प्र.संशोधन अधिनियम २०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, पोलीस उपअधीक्षक श्री गायकवाड, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीमती अफुने, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, यांनी पोहेकॉ श्री आढाव, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना श्री कयाडे, पोना श्री पंचलिंगे, पोशि श्री थोरात, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री सरनाईक अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.–१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,**
**मोबाईल क्रमांक :– ८८८८७१७९९९, ९९२३०४२५६५, ८९७७८९८८२५.**

Scanned by CamScanner